# सकारात्मक दृष्टिकोनातून प्रतिकूल स्थितीतही यश मिळते

## मोठ्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांचा सल्ला; 'मुक्काम पोस्ट रत्नागिरी' मुलाखतीचा कार्यक्रम

**सकाळ वृत्तसेवा**

रत्नागिरी, ता. १९ : "जिद्द व आत्मविश्वासाने काम करा. श्रमाला प्रतिष्ठा आहे, त्यामुळे प्रत्येक गोष्टीचे नियोजन करा. सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यास प्रतिकूल स्थितीतही यश तुमचेच असते," असा सल्ला मूळच्या रत्नागिरीतील पण सध्या मोठमोठ्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांनी दिला.

खातू नाट्यगृहात जागतिक मराठी अकादमी आयोजित शोध मराठी मनाचा संमेलनातील 'मुक्काम पोस्ट रत्नागिरी' हा मुलाखतीचा कार्यक्रम आज दुपारी झाला. मूळचे चिपळुणचे उद्योजक व यूआरएल फौंडेशनचे अध्यक्ष उदयदादा लाड, बीसीसीआयचे उपाध्यक्ष रवी सावंत, दूरदर्शनवरील कार्यक्रमांचे निर्माते

जागतिक मराठी अकादमी

जयू भाटकर व 'बुकगंगा'चे सर्वेसर्वा मंदार जोगळेकर यांची प्रकट मुलाखत घेण्यात आली. सुहास विद्वांस व नितीन केळकर यांनी मुलाखत घेतली. अकादमीचे अध्यक्ष रामदास फुटाणे यांनी मान्यवरांचा सत्कार केला.

मूळचे साखरप्याचे मंदार जोगळेकर यांनी सांगितले, "पुण्यात गेल्यानंतर इंग्रजी बोलण्याचा प्रश्न उपस्थित झाला. प्रसंगी गावी यावे, असे वाटू लागले; पण निश्चयाने शिकलो व कॅलिफोर्नियातही गेलो. तिथे विश्व मराठी साहित्य संमेलनाच्या वेळी इंग्रजीप्रमाणे मराठीतील पुस्तकेही एका क्लिकवर मिळावीत, अशी सूचना आली. त्यानंतर माय विश्व नावाची कंपनी सुरू करून बुकगंगा हा उपक्रम सुरू केला. पुण्यामध्ये ७५ जण व साखरपा येथे पंधरा जणांना रोजगार दिला. आज दहा हजार ई-पुस्तके उपलब्ध आहेत. अनेक पुस्तके मोफत आहेत. मी यातून व्यवहार पाहत नाही, साहित्य मोफत पोहोचवण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. ग्रंथालयांमधील जुनी, वाळवी लागलेली पुस्तकेही ई-बुकद्वारे आणण्याचा प्रयत्न आहे."





**रत्नागिरी : शोध मराठी मनाचा संमेलनात मुक्काम पोस्ट रत्नागिरी कार्यक्रमात रविवारी बोलताना मंदार जोगळेकर. डावीकडून निवेदक सुहास विद्वांस, नितीन केळकर, उदयदादा लाड, रवी सावंत आणि जयू भाटकर. दुसऱ्या छायाचित्रात साखरपा येथे बुकगंगाच्या ई सेंटरमध्ये काम करणारे स्थानिक युवक-युवती.**

**(मकरंद पटवर्धन : सकाळ छायाचित्रसेवा)**

उदयदादांनी बालपण सांगताना झाडगावमधील आदर्श वसतिगृहातील शिस्तीचे दिवस, गंगाधरभाऊ पटवर्धनांनी विहारमध्ये विद्यार्थ्यांसाठी अल्पदरात दिलेल्या जेवणाच्या आठवणी सांगितल्या. ते म्हणाले, "आर्थिक स्थितीमुळे शिक्षण अपुरे राहिले, तरी आता ७१ व्या वर्षी मुक्त विद्यापीठातून ते पूर्ण करीत आहे. काळेकाकांनी दिलेल्या रकमेमुळेच मी आयुष्यात व व्यवसायात उभा राहिलो. त्यामुळे देव्हाऱ्यात आईवडिलांच्या फोटोसोबत त्यांचाही फोटो ठेवला आहे. शाळा, रुग्णालय, व्यक्ती, लाल मातीतील खेळाडूंसाठी यूआरएल फौंडेशनतर्फे मदत देतो. दिलेल्या मदतीची फारशी प्रसिद्धी करत नाही."

जयू भाटकर यांनी रत्नागिरीतील शाळा, महाविद्यालयातील बेछूट जीवनातून केवळ प्रत्येक वेळी कोणी ना कोणी सावरल्यानेच आज या पदावर दिसत असल्याचे आवर्जून सांगितले. आईची कडक शिस्त, एकमुखी दत्त मंदिरातील भजने व नाटकांचे संस्कार, कॉलेजमध्ये प्राचार्य बापू रानडे यांनी घेतलेल्या अभ्यासामुळे जीवनाला दिशा मिळाल्याचे ते म्हणाले.

बीसीसीआयचे उपाध्यक्ष सावंत हे मूळचे मिऱ्या गावचे. आपल्याला रत्नागिरीचा सार्थ अभिमान वाटत असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले, "जीवनात कोणतीही गोष्ट मनापासून व लक्ष देऊन केली तर यश मिळतेच. कॉमर्सला ३९ टक्के असूनही मी प्रथम श्रेणीत सीए उत्तीर्ण झालो. क्रिकेटचे वेड घरातूनच प्राप्त झाले. त्यामुळे हळूहळू क्रिकेट खेळत आणि मुंबई क्रिकेट असोसिएशन व बीसीसीआयचे उपाध्यक्षपद मिळाले. आपल्या कामाशी प्रामाणिक राहिल्यानेच हे पद मिळाले. भारतीय संघासाठी परदेशी प्रशिक्षक आणल्याने ते केवळ मार्गदर्शन करायचे व आपले खेळाडू काहीच शिकत नव्हते. त्यामुळे शिक्षणाची गरज आहे. चांगल्या कामाची नोंद राहते व योग्य वेळी पोचपावतीही मिळते. त्यामुळे काम करत राहा."

### 'बुकगंगा'च्या टीमचा सत्कार

'माय विश्व'चे मंदार जोगळेकर यांनी साखरपा येथील पंधरा युवक-युवतींना ई-बुक तयार करण्याचे काम शिकवले आहे. त्यामुळे देवरूख, साखरपा परिसरातील पंधरा जणांना रोजगार मिळाला. गेल्या दीड वर्षापासून येथे ई-बुक सेंटर सुरू झाले आहे. या कर्मचाऱ्यांनी मनोगत व्यक्त करताना 'आम्ही तयार केलेली पुस्तके सर्व जग वाचते, यात खूप आनंद वाटतो', असे सांगितले. या सर्वांचा सत्कार रवी सावंत यांच्या हस्ते झाला.